| | |
|---|---|
| MHSO200017852018 | **नियमित दिवाणी दावा क्र. १४५/२०१८** |

## निशाण क्र. ४१ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी मयत प्रतिवादी क्र. २ शहाजी सोपान भोसले यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात वादींचे कथन असे आहे की, सदर दाव्याचे काम चालू असताना यातील प्रतिवादी क्र. २ शहाजी सोपान भोसले हे दि. ०६/०३/२०१९ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी क्र. २ चे वारस त्यांची पत्नी, मुलगा व मुलगी असे असून सदर वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे व जरुरीचे आहे. सदर मयताचे वारसांची माहिती वेळेत न मिळाल्यामूळे सदर वारसांना मुदतीत अभिलेखावर घेता आले नाही. सदर वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. सदरचा दावा हा स्थावर मिळकतीसंदर्भात असल्याने प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिलेला आहे. सबब, प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी वादींनी विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जास प्रतिवादींतर्फे म्हणणे देण्यात आले असून त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जात किती विलंब झाला आहे याचा उल्लेख केलेल नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जात वादींनी प्रतिवादी क्र. २ च्या वारसांची माहिती वेळेत न मिळाल्यामूळे सदर वारसांना मुदतीत

अभिलेखावर घेता आले नाही असे कारण नमूद केले आहे. वादींनी नि.क्र. ५० सोबत सदर मयत प्रतिवादी क्र. २ शहाजी सोपान भोसले यांच्या मृत्यूबाबतचा उल्लेख असलेला फेरफार क्र. १०२५ च्या उताऱ्याची संगणकीय प्रत (डिजीटल स्वाक्षरीची प्रत) दाखल केलेली आहे. तसेच, सदर कथनाच्या पृष्टयार्थ त्यांनी नि.क्र. ४२ वर शपथपत्र दाखल केलेले आहे. वादींच्या अर्जातील कथन तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी प्रतिवादी क्र. २ च्या वारसांना अभिलेखावर घेणेची संधी देणे हे न्यायाचे ठरेल. जर वादी यांना प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर घेणेची संधी देवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांचे न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. परंतू, वादींनी प्रतिवादी क्र. २ च्या वारसांना मुदतीत अभिलेखावर समावेश न केल्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण निष्कारण प्रलंबित राहिले व प्रतिवादींना विनाकारण मानसिक त्रास सहन करावा लागला. त्यामुळे सदरच्या बाबीसाठी वादींवर खर्चाचे आदेश पारीत करुन प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज वादींनी रक्कम रुपये १५००/– (रुपये पंधराशे फक्त) प्रतिवादींना खर्च देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी उपरोक्त नमूद अटीची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2025.11.17 17:30:05 +0530

दिनांक – १७/११/२०२५

**(एस. एस. साळुंखे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १७/११/२०२५ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | १७/११/२०२५ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | १८/११/२०२५ |